**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय**
दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

---

वाचा :- १) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि. १९ मार्च २०१९ चे परिपत्रक.

---

शुध्दीपत्रक

क्रमांक:- एमआयएस ११२०१८/१२७२/५-ब, मुंबई, दि. 30 मार्च, २०१९.

विषय :- भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) यांच्या दि.१९ मार्च २०१८ रोजीच्या अधिसुचनेन्वये मद्यांच्या लेबलवर छापावयाच्या मजकुराबाबत.

भारतीय अन्न सुरक्षा व प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) यांच्या निर्देशानुसार या कार्यालयाच्या उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये देशी / विदेशी मद्य / बियर / वाईन च्या लेबल्स बाबत निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१) मुद्दा क्रमांक-४ ऐवजी मद्य निर्माण्यांमध्ये शिल्लक असलेल्या लेबल्सचा दिनांक ०१/०४/२०१९ पासून पुढील ६ महिन्यापर्यंत वापर करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच दिनांक ०१ एप्रिल २०१९ पुर्वी निर्मित / उत्पादित मद्य / बीयर / वाईन दि. ३१ मार्च २०२० पर्यंत बाजारात विक्री करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२) मुद्दा क्रमांक - ७ ऐवजी घटकांना यापुर्वी त्यांना मंजूर असलेल्या ब्रॅण्डच्या लेबल्समध्ये या कार्यालयाचे दि. १९ मार्च २०१९ च्या परिपत्रकान्वये सुचित केलेले आवश्यक बदल करून नवीन लेबल्स संबंधीत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडून दि. ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत मंजूर करून घेण्याची जबाबदारी घटकाची असेल. तसेच दि. ३० सप्टेंबर २०१९ नंतर अशा प्रकारे प्राप्त झालेले लेबल्स कोणत्याही परिस्थितीत मंजूर करता येणार नाही तसेच सदर बाबत मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**मा. आयुक्तांच्या मान्यतेने.**

30/3/19

( विश्वनाथ इंदिसे )
सह- आयुक्त (मळी / मद्यार्क)
राज्य उत्पादन शुल्क, म. रा., मुंबई.

प्रति,

१) सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४) सर्व पीएलएल, बीआरएल, सीएल-१ आणि एफएल-१ अनुज्ञप्तीवरील प्रभारी अधिकारी.
५) सर्व पीएलएल, बीआरएल, सीएल-१, 'K' प्रमाणपत्र आणि एफएल-१ अनुज्ञप्तीधारक
६) या कार्यालयातील कार्यासन क्र. ८ (कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याकरीता)
७) अभिलेख शाखा (५प्रती)